Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/डीपी/उ.मा./वि.मा./२८३७
दि: १२/०८/२०२६

**प्रति,**
**मुख्याध्यापक/प्राचार्य,**
**सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,**
**सातारा,सांगली,कोल्हापूर.**

**विषय: आगामी फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत शपथ घेणेबाबत..**
संदर्भ: क्रमांक रा.मं./परीक्षा-५/३३८० दि.११/०८/२०२६ चे राज्य मंडळ,पुणे यांचे प्राप्त पत्र.

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की,राज्य मंडळाच्या संदर्भिय पत्रानुसार सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आगामी फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कॉपीमुक्त,भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी दि.१५ ऑगस्ट २०२६ रोजी ध्वजारोहणाचे वेळी शपथ घेणेची आहे.

**अनुराधा म्हेत्रे,**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.**

**सोबत : शपथ प्रपत्र जोडलेले आहे.**

# विद्यार्थ्यांनी घ्यावयाची शपथ

मी शपथ घेतो की, मी फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही.

जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन. परीक्षेला सामोरे जाताना मंडळ सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करेन. मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. तसेच परीक्षेस आत्मविश्वासाने, निर्भिडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई वडीलांचे व गुरूजनांचे नाव उज्ज्वल करेन.

जय हिंद!- जय महाराष्ट्र!

Scanned with OKEN Scanner